प्रेस नोट,                                                   दिनांक :- १०/१०/२०१७

**मार्केटयार्ड पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

मार्केटयार्ड पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे अजय ऊर्फ भागप्पा मुळे, वय २४ वर्षे, रा.सर्वे क्रमांक ५७०, आंबेडकरनगर, मार्केटयार्ड, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह मार्केटयार्ड पोलीस ठाणे परिसरात कुकरी, चाकू, कोयता, यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खंडणी मागणे, दुखापत करणे, जबरी चोरी करणे, दरोडयाची तयारी करणे, घातक शस्त्रे जवळ बाळगणे यासारंखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन-२०१५ पासून चालू आहेत. त्याचेविरूध्द वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, गुन्हे, श्री. देशमुख, मार्केटयार्ड पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचेविरुध्द दिनांक ०९/१०/२०१७ रोजी एमप्डीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यांनुसार त्यास कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येत आहे.

गेले नऊ महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या १७ इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.

---००----